<u>निशाणी क्र. २१</u>

<u>नियं.फौ.ख.क्र. ५६/२०१८</u>
<u>सरकार वि. दगा काकुळते वै.</u>

## साक्षीदार क्रमांक ३ शपथेवर पुरावा

**नाव** – मोहन सुभाष पाकळे,
**वय** – ३१ वर्षे, **व्यवसाय** – शेती,
**रा.** – धमणार, ता. साक्री, जि. धुळे.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री. दिशान जयकर यांचेमार्फत.**

१. दिनांक १३.०५.२०१७ रोजी मी धमणार गावात हजर असतांना पोलीस माझेकडे आले व दोन कागदांवर माझ्या सहया घेतल्या. पोलिसांनी माझ्यासमोर घटनास्थळ पंचनामा आणि काठी जप्तीचा पंचनामा तयार केला नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला आहे. त्यावर पंच क्रमांक २ म्हणुन माझी सही आहे. त्यात लिहीलेला मजकुर मला माहित नाही. घटनास्थळ पंचनाम्याला ओळखीसाठी **निशाणी क्रमांक पी–१/सा.क्र.३ (पुराव्याचे अधीन)** देण्यात येत आहे.

२. आता मला हत्यार जप्ती पंचनामा दाखविण्यात आला आहे. त्यावर पंच क्रमांक २ म्हणुन माझी सही आहे. त्यात लिहीलेला मजकुर मला माहित नाही. जप्ती पंचनाम्याला ओळखीसाठी **निशाणी क्रमांक पी–२/सा.क्र.३ (पुराव्याचे अधीन)** देण्यात येत आहे.

३. असे काही घडले नाही की, १३.०५.२०१७ रोजी पोलीसांनी मला धमणार गावात राजेंद्र दिगंबर काकुळते यांचे घरासमोर बोलविले होते व तेथे माझेसमक्ष घटनास्थळाची पाहणी करुन पंचनामा व नकाशा तयार केला होता व त्यावर पंच म्हणून माझी सही घेतली होती.

४. असे काही घडले नाही की, १३.०५.२०१७ रोजी पोलीसांनी माझेसमक्ष आरोपी पप्पू दगा काकुळते याचेकडून एक लाकडी काठी जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला होता व त्यावर पंच म्हणून माझी सही घेतली होती.

**साक्षीदार सरकार पक्षास मदत करीत नसल्यामुळे, सहाय्यक सरकारी वकील यांनी साक्षीदाराला उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.**

**अभियोग पक्षातर्फे उलटतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जयकर यांचेमार्फत.**

५.		हे म्हणणे खरे नाही की, १३.०५.२०१७ रोजी पोलीसांनी मला धमणार गावात राजेंद्र दिगंबर काकुळते यांचे घरासमोर बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळाची पाहणी करुन पंचनामा व नकाशा तयार केला होता व त्यावर पंच म्हणून माझी सही घेतली होती.

६.		हे म्हणणे खरे नाही की, १३.०५.२०१७ रोजी पोलीसांनी माझेसमक्ष आरोपी पप्पू दगा काकुळते याचेकडून एक लाकडी काठी जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला होता व त्यावर पंच म्हणून माझी सही घेतली होती.

७.		हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींना ओळखतो कारण आम्ही एकाच गावात राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास – आरोपी तर्फे वकील श्री. अजहर शेख यांनी नाकारला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/–

**(शहेजाद परवेज)**

दिनांक : २१.०८.२०२४		न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, साक्री.